रयत शिक्षण संस्थेचे,
# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर
(स्वायत्त)
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित
स्थापना : १९६०
कर्मवीर पथ, पंढरपूर - ४१३ ३०४, जि. सोलापूर (महाराष्ट्र)
Jr. College Index No. : J 24.08.001
U-DISE No.: 27300810371
ऑफिस : (०२१८६) २२३१०४ * E-mail : kbppandharpur@gmail.com * Website : www.kbpmpandharpur.in
संस्थापक : पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील डी.लिट.

| नॅक मानांकन सी.जी.पी.ए. : ३.५१ (२०१७ पासून) | डी.एस.टी.-फिस्ट योजना भारत सरकार (२०१३ पासून) | आदर्श महाविद्यालय पारितोषिक पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व रयत शिक्षण संस्था, सातारा (२०१५) | यु.जी.सी. सी.पी.ई. दर्जा (२०१७-१८) | यु.जी.सी. परामर्श योजना (२०१९-२०) |
|---|---|---|---|---|

जा. क्र. 285/22-23 दिनांक : 12/5/2022
प्राचार्य डॉ. डी. जे. साळुंखे एम.एस्सी., पीएच.डी.

प्रति,
मा.
महाविद्यालय विकास समिती,
क.भा. पाटील महाविद्यलाय, पंढरपूर.

यांना स. न. वि. वि.

**विषय :- महाविद्यालय विकास समितीच्या सभेबाबत.**

महोदय,

वरील विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, महाविद्यालय विकास समितीची शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील तिसरी सभा मा. संजीवजी पाटील साहेब (चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा यांचे प्रतिनिधी) यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १७/५/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजित केलेली असून सदर सभेस आपण उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

सभेपुढील विषय :-

१) मागील सभेचे इतिवृत वाचून कायम करणे.
२) स्थानिक निवड समिती मार्फत नियुक्त करण्यात आलेल्या विनाअनुदानित रिक्त पदावर सी.एच.बी. तत्वावरील सहाय्यक प्राध्यापकांच्या मानधनास मान्यता घेणे.
३) महाविद्यालयाच्या प्रशासकीय कार्यालयाच्या बाजूस ड्रेनेज लाईन दुरुस्तीचे काम केले असून त्यास आलेल्या खर्चास मान्यता घेणे.
४) नवीन व जुन्या मुलींच्या वसतिगृहाच्या बाजूस व वनस्पतीशास्त्र उद्यानामध्ये जुनी शहाबादी फरशी बसविण्याच्या कामास व येणा-या खर्चात मान्यता घेण.
५) रुसा कंपोनंट - ८ अंतर्गत ग्रंथालय स्टॅक रुम, कॉमन फॅसीलीटी सेंटर, फॅशन डिझाईन वर्कशॉप, ॲग्रो प्रोसेसिंग वर्कशॉप आणि सेमिनार हॉल निर्मिती कामास मंजूर डी.पी.आर. नुसार मान्यता घेणे.
६) महाविद्यालयातील सुरक्षा रक्षक नियुक्तीस मान्यता घेणे.
७) दिनांक ४/१२/२०२१ च्या बैठकीत विषय क्र. ६ व ९ च्या अनुषंगाने महाविद्यालय विकास समितीने गटीत केलेल्या समितीच्या शिफारशीवर चर्चा करणे.

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर
(स्वायत्त)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित

कर्मवीर पथ, पंढरपूर - ४१३ ३०४, जि. सोलापूर (महाराष्ट्र)

संस्थापक : पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील


जा. क्र. दिनांक : / / २०

८) प्रशासकीय कार्यालयातील बढतीने गेलेल्या सेवकांच्या रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरुपात सेवक नेमण्यास व त्यांच्या मानधनास मान्यता घेणे.

९) महाविद्यालयाच्या पोर्च मध्ये कर्मवीर अण्णांचे चरित्र दर्शक माहिती फलक तयार करण्यास व येणा-या खर्चास मान्यता घेणे.

१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणा-या ऐनवेळच्या विषयावर चर्चा करणे.

कळावे,

आपला विश्वासू,

सचिव/प्राचार्य,
महाविद्यालय विकास समिती,
क. भा. पाटील महाविद्यालय, पंढरपूर.

सभेच्या सुरवातीस महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन आणि सदस्य यांचे स्वागत मा.प्रि.डॉ.दादासाहेब साळुंखे यांनी केले. तदनंतर या वर्षात महाविद्यालयातील खालील सेवक व सेवकांच्या नातेवाईकांचे दु:खद निधन झाले आहे त्याबद्दल मा.प्राचार्य यांनी दुखवटा ठराव मांडला.

सभेच्या सुरवातीस रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष व माजी चेअरमन, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, ज्येष्ठ पुरोगामी विचारवंत, महाराष्ट्र राज्याचे माजी सहकारमंत्री आदरणीय प्रा.डॉ.एन.डी.पाटीलसाहेब यांचे दि.१७ जानेवारी, २०२२ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी दु:खद निधन झाले. रयत शिक्षण संस्थेचे कायदा सल्लागार व जनरल बॉडी सदस्य मा.अॅड.केशवराव विष्णु पाटील यांचे दि.२९ जानेवारी, २०२२ रोजी दु:खद निधन झाले. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडीचे सदस्य सेवानिवृत्त आजीव सभासद मा.नूरमहम्मद तांबोळी यांचे दि.११ मार्च, २०२२ रोजी दु:खद निधन झाले. महाराष्ट्राचे माजी मंत्री, रयत शिक्षण संस्थेचे माजी उपाध्यक्ष, माजी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तसेच जनरल बॉडीचे ज्येष्ठ सदस्य मा.शंकरराव गेणूजी कोल्हे यांचे दि.१६ मार्च, २०२२ रोजी दु:खद निधन झाले. महाविद्यालयातील प्रयोगशाळा परिचर श्री.अनिल गायकवाड यांच्या आई श्रीमती नागुबाई गायकवाड यांचे दि.१९ एप्रिल,२०२२ रोजी दु:खद निधन झाले. महाविद्यालयातील ग्रंथालय परिचर श्री.अशोक गुलाब माने यांचे दि.२७ एप्रिल,२०२२ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो याकरिता सभेने दोन मिनिटे स्तब्धता पाळून वरील सर्वांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली व सभेच्या कामकाजास पुढीलप्रमाणे सुरवात करण्यात आली.

विषय क्र.१ - **मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.**

ठराव क्र.१ - **मागील सभा शनिवार, दि.०४-१२-२०२१ च्या सभेचे इतिवृत्त वाचून दाखवण्यात आले. त्यावर सविस्तर चर्चा करुन इतिवृत्त मंजूर करण्यात आले.**

***ठराव सर्वानुमते मंजूर***

विषय क्र.२ - **सत्र क्रमांक दोनसाठी स्थनिक निवड समितीमार्फत नियुक्ती करण्यात आलेल्या विना अनुदानित रिक्त पदावर सी.एच.बी.तत्वावरील सहाय्यक प्राध्यापकांच्या मानधनास मान्यता घेणे.**

ठराव क्र.२- **सिनिअर विभागाकडे खालीलप्रमाणे सत्र क्रमांक दोनसाठी नियुक्त केलेल्या सी.एच.बी.तत्वावरील सहाय्यक प्राध्यापकांच्या मानधनास कृपया सभेची मान्यता मिळणेविषयी विनंती आहे.**

*** सिनी.विनाअनुदानित शिक्षक सेवक**

| अ.नं | नांव | मानधन रु. | अ.नं | नांव | मानधन रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.शहाणे एस.पी. | १४५०० | १२ | श्री.डॉ.यलभर एस.डी | १०००० |
| २ | श्रीमती बावळे ए.टी. | ११००० | १३ | श्री.शिंदेपाटील पी.बी | १०००० |
| ३ | श्री.ताटे के.आर | १२५०० | १४ | डॉ.खतीब ए.के. | १०००० |
| ४ | श्रीमती शिंदे पी.एम. | ११००० | १५ | श्री.माने ए.एस. | १०००० |
| ५ | श्रीमती जगताप व्ही.पी | १२००० | १६ | श्री.माळी डी.एम | १०००० |
| ६ | श्री.गायकवाड एम.के. | ११००० | १७ | श्री.गायकवाड एस.पी | १०००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | श्रीमती कदम एस.सी | ११००० | १८ | श्रीमती नाईकनवरे बी.बी. | १०००० |
| ८ | श्री.खेडकर एन.एच | १०००० | १९ | श्रीमती चव्हाण एच.पी | १०००० |
| ९ | श्रीमती मारकड व्ही.जी. | १०००० | २० | श्रीमती भोसले बी.एस. | १०००० |
| १० | श्रीमती मोरे एस.एस | ९००० | २१ | श्रीमती पाटील आर.आर | १०००० |
| ११ | श्री.सोनकांबळे एस.एल | १०००० | २२ | श्री.कोकरे ए.यु. | १०००० |

| अ.नं | नांव | मानधन रु. |
|---|---|---|
| २३ | श्री.रणदिवे ए.यु | १०००० |
| २४ | श्रीमती भांगे एस.एम | १०००० |
| २५ | श्री.सोनवले एस.एम | १०००० |
| २६ | श्री.भोंग ए.बी | १०००० |
| २७ | श्री.वाघ जे.पी | १०००० |
| २८ | श्री.गायकवाड बी.बी | १०००० |
| २९ | श्री.घळके एच.बी | १०००० |
| ३० | श्री.उघडे पी.यु | १०००० |
| ३१ | श्री.मोरे आर.जी | ९००० |
| ३२ | श्री.कदम ए.एस | ९००० |
| ३३ | श्री.बनसोडे एस.एम | ९००० |
| ३४ | श्री.गायकवाड के.पी | ९००० |

वरील विषयावर महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा.संजिव पाटीलसाहेब यांच्या सूचनेनुसार माढा कॉलेज व सोलापूर कॉलेज व पंढरपूर कॉलेज या तीन महाविद्यालयाने एकत्रित येवून तीन्ही महाविद्यालयाच्या मानधन वाढीमध्ये जादा तफावत राहणार नाही याची कार्यपध्दती तयार करुन मा.चेअरमन यांच्या मान्यतेसाठी पाठवून देण्याचे ठरले.

***ठराव सर्वानुमते मंजूर***

**विषय क्र.३ - महाविद्यालयाच्या प्रशासकीय कार्यालयाच्या बाजूस ड्रेनेज लाईन दुरुस्ती काम आणि आलेल्या खर्चास मान्यता घेणे.**

**ठराव क्र.३**- महाविद्यालयाच्या प्रशासकीय कार्यालयाशेजारील ड्रेनेज लाईन ही पूर्वीपासून जुन्या पध्दतीची व लहान होती. त्यावेळेस या ड्रेनेज लाईनला आय.क्यू.ए.सी.विभाग व प्राचार्य कार्यालय हे जोडले होते. परंतु महाविद्यालय स्वायत्त झाल्यामुळे परीक्षा विभाग व स्टाफरूमचे नुतनीकरण केल्यामुळे या ड्रेनेज लाईनला नवीन स्टाफरूम, आय.क्यु.ए.सी.विभाग, प्रशासकीय कार्यालय व प्राचार्य कार्यालय इ. टॉयलेट जोडल्याने सदरची ड्रेनेज लाईन सारखी तुंबत होती. त्यामुळे नवीन ड्रेनेज लाईन नगरपालिकेच्या ड्रेनेजला जोडली आहे. त्याकरिता रु.६५,०००/- इतका खर्च झालेला आहे. सदरच्या खर्चास सभेची परवानगी मिळणेविषयी विनंती आहे. तसेच त्याकरिता संस्था परवानगी जा.क्र.सई/१४०९० दि.२५/१/२०२२ ने मिळालेली आहे.सदर विषयावर सविस्तर चर्चा होवून सदर कामाच्या आलेल्या खर्चास सभेने मंजूरी दिली.

***ठराव सर्वानुमते मंजूर***

**विषय क्र.४- नवीन व जुन्या महिला वसतिगृहाच्या बाजूस व वनस्पतीशास्त्र उद्यानामध्ये जुनी शहाबादी फरशी बसविण्याच्या कामास व येणाऱ्या खर्चास परवानगी घेणे.**

ठराव क्र.४- महाविद्यालयातील वर्गखोल्यांमधील रुसा योजनेअंतर्गत नवीन फरशी बसविल्यामुळे वर्गातील शिल्लक राहीलेल्या जुन्या शहाबादी फरशीचा उपयोग मुलींच्या नवीन व जुन्या वसतिगृहाच्या दर्शनी बाजूस सदरची फरशी बसविणेच्या कामासाठी तसेच वनस्पतीशास्त्र उद्यानामध्येही जुनी शहाबादी फरशी बसविलेली आहे. सदर दोन्ही कामाकरिता रु.४१८६०/- इतका खर्च झालेला आहे. सदरच्या दोन्ही कामांच्या खर्चास परवानगी मिळावी ही विनंती.सदर खर्चास संस्थेकडील पत्र जा.क्र.सई/१५३८ दि.०६/०५/२०२२ ने मंजूरी दिलेली आहे. सभेमध्ये या विषयावर चर्चा होवून सभेने सदरच्या झालेल्या खर्चास मंजूरी दिली.

***ठराव सर्वानुमते मंजूर***

**विषय क्र.५ - रुसा कंपोनंट-८ अंतर्गत ग्रंथालय स्टॅक रुम, कॉमन फॅसिलिटी सेंटर, फॅशन डिझाईन वर्कशॉप, ॲग्रो प्रोसेसिंग वर्कशॉप आणि सेमिनार हॉल निर्मिती कामास मंजूर डी.पी.आर.नुसार मान्यता घेणे.**

ठराव क्र.५- महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या स्टॅकसाठी नवीन फर्निचर तयार करण्यात आले आहे. यासाठी रुसाअंतर्गत रु.३ लाख डी.पी.आर. मंजूर होते. ते काम पूर्ण झाले असून सदरच्या खर्चास मंजूरी मिळावी ही विनंती

- रुसा अंतर्गत ऑडीटोरीयमसाठी (सभागृह) व इंटेरिअर डिझायनिंगसाठी रु.८ लाख खर्च अपेक्षित आहे.
- रुसा अंतर्गत ई.ई.सी.व्दारे उद्योजगता व रोजगार क्षमता सेलव्दारे फॅशन डिझायनिंग कोर्स व ॲग्रो प्रोसेस युनिट या दोन कोर्ससाठी अंदाजे रु.६ लाख मशिनरी खरेदीसाठी खर्च अपेक्षित आहे. तसेच तेथे फर्निचर तयार करण्यासाठी अंदाजे रु.७ लाख खर्च अपेक्षित आहे.
- रुसा अंतर्गत कॉमन फॅसिलीटी सेंटरसाठी अंदाजे रु.४ लाख खर्च अपेक्षित आहे.

सभेमध्ये या विषयावर चर्चा होवून सभेने सदरच्या झालेल्या खर्चास मंजूरी दिली.

***ठराव सर्वानुमते मंजूर***

**विषय क्र.६- महाविद्यालयातील नवीन सुरक्षा रक्षक नियुक्तीस व मानधानास मान्यता घेणे.**

ठराव क्र.६ - महाविद्यालय कोरोना कालावधीनंतर ऑफलाईन पध्दतीने सुरु झाल्यामुळे महाविद्यालयाने नेमलेले पूर्वीचे सिक्युरिटी गार्ड व्यवस्थित काम करीत नसल्यामुळे त्यांचे जागी एप्रिल २०२२ पासून नवीन सुरक्षा रक्षक विहित पध्दतीने कोटेशन घेऊन अलर्ट सुरक्षा रक्षक अँन्ड लेबर सप्लायर्स, पंढरपूर यांना एका सुरक्षा रक्षकास प्रति महिना रु.६०००/- प्रमाणे दोन सुरक्षा रक्षकांची नेमणूक केलेली आहे. तरी सदरच्या सुरक्षा रक्षक नेमणूकीस व त्यांच्या मानधास तसेच आणखी एक सुरक्षा रक्षक मुलींच्या वसतिगृहाजवळील गेटजवळ नेमण्यास सभेनी मंजूरी दिली.

***ठराव सर्वानुमते मंजूर***

विषय क्र.७- **दि.४/१२/२०२१ च्या बैठकीस विषय क्र.६ व ९ च्या अनुशंगाने महाविद्यालय विकास समितीने गठीत केलेल्या समितीच्या शिफारशींवर चर्चा करणे.**

ठराव क्र.७- दि.४/१२/२०२१ रोजी झालेल्या महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीमध्ये विषय क्र.६ व ९च्या अनुषंगाने मा.चेअरमन यांनी समिती गठीत करण्याची सूचना केली होती. त्यानुसार विषय क्र.६ महाविद्यालयात स्वच्छता, बागकाम व कार्यालयीन सहाय्यक अशा स्वरुपाचे कामे करीत असलेल्या रोजंदारीवरील सेवकांच्या वेतनवाढीबाबत आणि विषय क्र.९ स्वयं अर्थसहाय्यता (बी.सी.ए.,ई.सी.एस.) या कोर्सच्या सहाय्यक प्राध्यापकांच्या वेतनवाढीबाबत विषयांवर चर्चा करण्यासाठी गठित समितीची बैठक दि.६/४/२०२२ रोजी संपन्न झाली. या बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्राचार्य डॉ.डी.जे.साळुंखे - चेअरमन

२. मा.प्राचार्य डॉ.एस.आर.ढेरे- सदस्य

३. मा.प्र.प्राचार्य डॉ.आर.पी.ढवण- सदस्य

४. मा.डॉ.बी.बी.शितोळे - सदस्य

५. श्री.एस.आर.साळुंखे - सचिव

वरील विषयावर महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा.संजिव पाटीलसाहेब यांच्या सूचनेनुसार कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय,सोलापूर व कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर या तीन महाविद्यालयाच्या प्रमुखांनी एकत्रित येवून दि.२५ मे २०२२ पर्यंत मानधन वाढीबबत कार्यपध्दती तयार करुन मा.चेअरमन यांचेकडे सादर करावी आणि त्यापुढील सर्व अधिकार महाविद्यालय विकास समितीचे मा.चेअरमन संजीवजी पाटीलसाहेब यांचेकडे राहतील असे ठरविण्यात आले.

***ठराव सर्वानुमते मंजूर***

विषय क्र.८- **प्रशासकीय कार्यालयातील बढतीने गेलेल्या सेवकांच्या रिक्त पदांवर तात्पुरत्या स्वरुपात सेवक नेमण्यास व त्यांच्या मानधनास मान्यता घेणे.**

ठराव क्र.८- महाविद्यालयामधील कार्यालयातील बढतीने गेलेले प्रशासकीय सेवक व यापूर्वी रिक्त असलेल्या जागेवर संस्थेकडून कोणत्याही प्रकारची नेमणूक केलेली नाही. दि.१-१०-२०१७ च्या विद्यार्थी संख्येनुसार मा.शिक्षण सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील शिक्षकेतर सेवकांची एकूण ८६ पदे मंजूर केलेली असून त्यापैकी आजरोजी ४५ शिक्षकेतर सेवक कार्यरत आहेत व ४१ पदे रिक्त आहेत. त्यामुळे महाविद्यालयातील कामकाजामध्ये प्रचंड अडचणी निर्माण होत असल्यामुळे रोजंदारी तत्वावर सेवक नेमण्यास व त्यांच्या मानधनास आपली परवानगी मिळावी ही विनंती. रिक्त पद तपशिल पुढीलप्रमाणे-

त्रिसन क्र. ७ कराए वर्गीकरण

रयत शिक्षण संस्था

सोलापूर विभाग वेतन निश्चिती धोरण

**कनिष्ठ विभाग -**

| अ. क्र | महाविद्यालयाचे नाव | कला (Rs.) | वाणिज्य (Rs.) | विज्ञान (Rs.) |
|---|---|---|---|---|
| १ | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर. | ८००० | ८००० | १०००० |
| २ | लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर. | ८००० | ८००० | १०००० |
| ३ | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा. | ८००० | ८००० | ११००० |

**वरिष्ठ विभाग -**

| अ. क्र | महाविद्यालयाचे नाव | कला | | वाणिज्य | | विज्ञान | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Qualified (Rs.) | Non - Qualified (Rs.) | Qualified (Rs.) | Non - Qualified (Rs.) | Qualified (Rs.) | Non - Qualified (Rs.) |
| १ | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर. | १०००० | ९००० | १०००० | ९००० | १०००० | ९००० |
| २ | लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर. | १०००० | ९००० | १०००० | ९००० | १०००० | ९००० |
| ३ | कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा. | १०००० | ९००० | १०००० | ९००० | - | - |

- **P.G. –** Paper Wise Remuneration Rs. 8000/- per Paper
- **U.G. –** Self Finance Professional Courses

| Upto 5 Years (Rs.) | 6 to 10 Years (Rs.) | 11 to 15 Years (Rs.) | Above 16 Years (Rs.) |
|---|---|---|---|
| 11000 | 14000 | 16000 | 18000 to 25000 |

- **MCVC (Jr. College) –** Rs. 8000/- Subject to Fees of Rs. 3000/-
- **Daily Wages Workers –**

1) Worked for Gardening, Cleaning etc.

| upto 5 Years (Rs.) | 6 to 10 Years (Rs.) | Above 10 Years (Rs.) |
|---|---|---|
| 6000 | 8000 | 9000 |

2) Clerical Work –

| upto 5 Years (Rs.) | 6 to 10 Years (Rs.) | Above 10 Years (Rs.) |
|---|---|---|
| 8000 | 10000 | 11000 |

3) Clerical Working of Tally Data Processing, Examination Work etc.

| upto 5 Years (Rs.) | 6 to 10 Years (Rs.) | Above 10 Years (Rs.) |
|---|---|---|
| 12000 | 15000 | 17000 |

In addition to this confidential allowance Rs. 3000/- for Examination work of Autonomous College

Karmaveer Bhaurao Patil Mahavidyalaya Pandharpur

PRINCIPAL,
KARMAVEER BHAURAO PATIL
MAHAVIDYALAYA, PANDHARPUR.

| अ.नं. | एकूण पदे | पदसंख्या | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | प्रबंधक | ०१ | - | ०१ |
| २ | अधिक्षक | ०१ | ०१ | - |
| ३ | मुख्य लिपीक | ०१ | ०१ | - |
| ४ | वरिष्ठ लघुलेखक | ०१ | ०१ | - |
| ५ | सहाय्यक ग्रंथपाल | ०१ | ०१ | - |
| ६ | वरिष्ठ लिपीक | ०३ | ०२ | ०१ |
| ७ | कनिष्ठ लिपीक | ०७ | - | ०७ |
| ८ | प्रयोगशाळा सहाय्यक | ०८ | ०३ | ०५ |
| ९ | ग्रंथालय लिपीक | ०३ | ०१ | ०२ |
| १० | ग्रंथालय परिचर | १२ | ०८ | ०४ |
| ११ | प्रयोगशाळा परिचर | ३२ | २३ | ०९ |
| १२ | शिपाई | १६ | ०४ | १२ |
| | एकूण | ८६ | ४५ | ४१ |

वरील विषयावर महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा.संजीवजी पाटीलसाहेब यांनी आवश्यकतेनुसार लागणारी पदे याचा तपशिल देवून पदे भरण्याचे ठरले.

***ठराव सर्वानुमते मंजूर***

विषय क्र.९ - **महाविद्यालयातील पोर्चमध्ये कर्मवीर अण्णांचे चरित्र दर्शक माहिती फलक तयार करण्यास आणि त्यांच्या येणाऱ्या खर्चास मान्यता घेणे.**

ठराव क्र.९- महाविद्यालयातील मुख्य पोर्चमध्ये अण्णांचे चरित्र व कार्य सर्व विद्यार्थ्यांना कळावे व माहिती व्हावी याकरिता कर्मवीर अण्णांचे चरित्रदर्शक माहिती फलक तयार करणे आवश्यक होते. याकरिता खर्च रु.८०,०००/- झालेला आहे त्यास संस्थेच्या परवानगीकरिता जा.क्र.२७४/२२-२३ दि.११/०५/२०२२ ने पत्र पाठविलेले आहे.

**विषय क्र.१०- मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळच्या विषयावर चर्चा करणे.**

**१. एम.कॉम.भाग-१ व २ च्या रु.१६०००/- इतक्या मानधनाबाबत चर्चा करणे.**

ठराव १ - सन २०२१-२२ मधील एम.कॉम.भाग-१ व २ या विषयाचे प्राध्यापक श्री.अनंतकवळस टी.व्ही.हे आजारी असल्यामुळे त्या काळात त्यांना मानधन देण्यात आले नव्हते. त्यामुळे चालू वर्षात मानधन देण्याचे सर्वानुमते ठरले.

-ठराव सर्वानुमते मंजूर

**२. मे श्रीनाथ हार्डवेअर ॲन्ड जनरल स्टोअर्स यांचे सन २०१७-१८ मधील रंगकामाचे रु.२,५२,८८८/- बीले आदा करणेसंदर्भात चर्चा करणे.**

ठराव २- महाविद्यालयामध्ये नॅकच्या काळात रंगकाम केले होते. सदरच्या रंगकामाचे बील थकीत असल्यामुळे महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा.संजीवजी पाटीलसाहेब यांनी संस्था मार्गदर्शनबाबत पत्रव्यवहार करण्याचे सर्वानुमते ठरले.

-ठराव सर्वानुमते मंजूर

**३. प्रा.डॉ.माने एस.एस.यांच्या एन.सी.सी.ट्रेनिंगसाठी झालेल्या रु.५४,३५५/- इतक्या खर्चास मान्यता घेणेविषयी चर्चा करणे.**

ठराव ३- प्रा.डॉ.माने एस.एस.यांनी एन.सी.सी.ट्रेनिंगसाठी रु.५४,३५५/- इतका खालील बाबींवर खर्च झालेला सभेपुढे दाखविण्यात आला.

१. एन.सी.सी.युनिर्फाम - २१४७०/-
२. पी.टी.युनिफॉर्म - ३३३०/-
३. एन.सी.सी.शूज - ७९८०/-
४. मेसिंग फॅसिलिटी - ७२००/-
५. सहभाग वर्गणी - २१५०/-
६. इतर आवश्यक वस्तु - ८१७०/-
७. स्टेशनरी व पुस्तके - ४०५५/-

यावर सविस्तर चर्चा होवून वरीलप्रमाणे एन.सी.सी.ट्रेनिंगसाठी झालेल्या रु.५४,३५५/- इतक्या खर्चास सभेने मंजूरी दिली.

-ठराव सर्वानुमते मंजूर

**४. बी.व्होक.विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्या मानधनाबाबत चर्चा करणे.**

ठराव-३ - महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा.संजीवजी पाटीलसाहेब यांच्या सूचनेप्रमाणे तीन्ही महाविद्यालयातील प्राचार्यांनी मानधनाबाबत एक विशिष्ठ आराखडा तयार करुन चेअरमनसाहेबांच्या मान्यतेसाठी लवकरात लवकर ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

-ठराव सर्वानुमते मंजूर

**५. महाविद्यालयाच्या इमारतीवर LED Display बसविणेबाबत चर्चा करणे.**

ठराव-४ - महाविद्यालयामध्ये डी विंगकडील इमारतीवर कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर नावाचा LED Display असावा त्यामुळे महाविद्यालयाचे नांव चारही बाजूंनी दिसेल व ओळखले जाईल अशा पध्दतीने बसविण्यासाठी व येणाऱ्या खर्चास मा.चेअरमनसाहेब यांनी सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

-ठराव सर्वानुमते मंजूर

**६. महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये मध्यभागी असणारे लॉन नव्याने विकसीत करण्यासाठीच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत चर्चा करणे.**

ठराव-४ - महाविद्यालयाच्या परिसरामध्ये सध्या असणारे लॉन बसवून साधारण १५ वर्षे झाल्यामुळे व त्याची मर्यादा संपुष्टात आली असल्याने त्यामुळे महाविद्यालयाचा दर्शनी भाग हा खराब दिसू लागला आहे. त्यामुळे त्या लॉनच्या ठिकाणी नवीन लॉन बसवून घेण्याची अत्यंत गरज असल्याने सदरच्या येणाऱ्या खर्चास मा.चेअरमनसाहेबांनी सदरचे काम हे नॅकच्या वेळेस करण्याचे सूचविले आहे. त्यास सर्वांनी मंजूरी दिली.

-ठराव सर्वानुमते मंजूर

**७. महाविद्यालयाने मागणी केलेल्या बेंचच्या संदर्भात चर्चा करणे.**

ठराव ४ - महाविद्यालयाच्या परिसरामध्ये असलेले जुने सागवानी बेंच हे महाविद्यालयाच्या भविष्यात येणाऱ्या उपयोगासाठी ठेवण्यात आले होते. परंतु संस्थेच्या सावळज माहाविद्यालय व महिला महाविद्यालय, सोलापूर यांनी बेंच संदर्भात मागणी केली होती. सावळज महाविद्यालयास यापूर्वी बेंच देण्यात आले होते. त्यामुळे मा.चेअरमनसाहेबांनी महिला महाविद्यालय,सोलापूर यांची वाढीव वर्गखोल्या विचारात घेता ५० बेंच सोलापूर महाविद्यालयास देण्याचे सर्वानुमते ठरले.

-ठराव सर्वानुमते मंजूर

**८. महाविद्यालयात पी.जी.इमारत प्लॅनला मंजूरी घेणेबाबत चर्चा करणे.**

ठराव ८- महाविद्यालयामध्ये सध्या सोलापूर विद्यापीठ सोलापूर अंतर्गत ९ विषयास पी.जी.अभ्यासमंडळास सोलापूर विद्यापीठाने मंजूरी दिली असल्याने व सध्या आपल्याकडे लॅब व वर्गखोल्यांची कमतरता असल्यामुळे बॉटनीकल गार्डनमध्ये ग्रंथालय व डी विंग यांच्यामधील जागेमध्ये पी.जी.इमारतीच्या प्लॅन इस्टिमेटला परवानगी देण्याचे सर्वानुमते ठरले.

-ठराव सर्वानुमते मंजूर

**९. आबासाहेब मराठे कॉलेज, राजापूर यांना आर्थिक मदत देणेबाबत चर्चा करणेबाबत.**

ठराव ९- रयत शिक्षण संस्थेचे रयत इंग्लिश मेडियमकडे वॉल कंपौंडचे बांधकाम अर्धवट असल्यामुळे महाविद्यालयाची कामे सुरु असल्यमुळे व नवीन पी.जी.इमारत बांधकाम करावयाचे असल्याने आर्थिक मदत देता येणार नाही असे सर्वानुमते ठरले.

-ठराव सर्वानुमते मंजूर

१०. गोल्डन ज्युबली इमारतीकडे पोर्चमध्ये जाळी लावणेसंदर्भात चर्चा करणे.

ठराव १०- महाविद्यालयाच्या परिसरामध्ये असलेली गोल्डन ज्युबली इमारत सध्या महाविद्यालयाचे वर्ग चालू असनात त्या ठिकाणी पक्षी बसतात व घाण करतात. त्यामुळे त्या ठिकाणी लोखंडी जाळी बसविल्यामुळे तेथे पक्षी बसणार नाहीत व तो परिसर स्वच्छ राहील. यावर सविस्तर चर्चा होवून सभेने जाळी बसविण्यास व येणाऱ्या खर्चास मंजूरी दिली.

-ठराव सर्वानुमते मंजूर

११. लेडिज होस्टेलकडील मुलींच्या सुरक्षीततेसाठी गेट बसविणेबाबत चर्चा करणेबाबत.

ठराव ११- महाविद्यालयाच्या लेडिज होस्टेल परिसरामध्ये मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने लोखंडी गेट बसविण्यात आले. त्यासाठी मजूरीसह झालेल्या खर्चास सभेमध्ये चर्चा होवून मान्यता देण्यात आली.

-ठराव सर्वानुमते मंजूर

१२. ई.सी.एस.विभागात २० बॅटरी खरेदीबाबत चर्चा करणे.

ठराव १२- महाविद्यालयाच्या ई.सी.एस.विभागामध्ये पूर्वीच्या जुन्या बॅटऱ्या खराब झाल्यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक अडचण निर्माण झाली होती. त्यासाठी त्या विभागामध्ये अंदाजे २० बॅटऱ्या खरेदी करणेबाबत मा.चेअरमनसाहेबांनी संस्था परवानगीसाठी पत्रव्यवहार करण्याचे ठरले.

-ठराव सर्वानुमते मंजूर

१३. जर्नल्स स्थानिक पातळीवर खरेदी करणेसंदर्भात चर्चा करणे.

ठराव १३- महाविद्यालयातील सायन्स विभागामध्ये मुलांच्या प्रात्यक्षिकांसाठी जर्नल्सची आवश्यकता असल्यामुळे सदर विषयावर सभेमध्ये सविस्तर चर्चा होवून सदरची जर्नल्स स्थानिक पातळीवर खरेदी करणेबाबत रयत शिक्षण संस्था, स्टोअर विभाग, सातारा यांची परवानगी घेणेबाबत ठरले.

-ठराव सर्वानुमते मंजूर

सभेच्या शेवटी डॉ.शितोळे बी.बी.यांनी उपस्थितांचे आभार मानले व मा.अध्यक्षांच्या परवानगीने ही सभा संपल्याचे जाहीर केले.

सचिव/प्राचार्य,
महाविद्यालय विकास समिती
क.भा.पा.महाविद्यालय,पंढरपूर

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर

अध्यक्ष
महाविद्यालय विकास समिती
क.भा.पा.महाविद्यालय,पंढरपूर